# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक १ एप्रिल, २०१३.
## (सकाळी १०.०० ते ११.१५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना - (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

**(मंगळवार, दिनांक २६ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना - अनुक्रमांक १ ते ४) -**

(१) **ॲड. अनिल परब वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **गृहमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" राज्यात होणारी पोलीस भरती ही 'सरळसेवा भरती प्रक्रिया' व 'पोलीस खात्यात काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मुलांची भरती' अशा दोन प्रकारे करण्यात येत असतांना सन २००३ नंतर सरळसेवा भरती प्रक्रिया झाली, परंतु आतापर्यंत पोलीस खात्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मुलांची भरती प्रक्रिया करण्यात न येणे, यामुळे राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलांमध्ये निर्माण झालेले निराशेचे वातावरण, ज्याप्रमाणे सरळसेवा भरती प्रक्रिया करण्यात येते, त्याप्रमाणे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलांकरिता करण्यात येणारी भरती शासनाने पुन्हा सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. राजेंद्र जैन,** हेमंत टकले, विक्रम काळे, सतीश चव्हाण **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **गृहमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"शासनाच्या गृह मंत्रालयाने दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ रोजी परिपत्रक काढून गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील एकूण ७ तालुक्यांना नक्षलप्रभावीत यादीतून वगळण्याचा घेण्यात आलेला निर्णय, यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, गोरेगांव, तिरोडा, आमगांव असे ४ तालुके आणि भंडारा जिल्ह्यातील साकोली, लाखनी, लाखांदूर अशा ३ तालुक्यांचा समावेश असणे, मध्यप्रदेशातील अति नक्षलप्रभावीत जिल्हे सदर दोन्ही जिल्ह्यांना लागून असणे, ज्यामुळे नक्षलवाद्यांची दोन्ही जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये सतत आवागमन सुरु असणे, त्यामुळे दोन्ही जिल्ह्यातील जनता नक्षल कारवायांमुळे त्रस्त असताना सदर तालुके नक्षलग्रस्त यादीतून वगळण्याचा घेतलेला निर्णय, यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष आणि असुरक्षिततेची भावना, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना,

यावर शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. दिवाकर रावते वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **जलसंपदा (कृष्णा खोरे व पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"ठाणे जिल्ह्यातील जलसंपदा विभागाच्या सुर्या प्रकल्पातील निकृष्ट बांधकामे, प्रत्यक्ष काम न करता बोगस बिले तयार करणे, बेकायदेशीर कामाचा वाढीव खर्च दाखविणे, इत्यादीबाबत चौकशी करण्यासाठी ऑगस्ट, २०१० मध्ये नेमलेल्या जलसंपदा विभागाचे सह सचिव समितीने सखोल चौकशी करणे, या चौकशीमध्ये राज्य शासनाचे सुमोर अडीच कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे आढळून येणे, या गैरव्यवहारात उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता जबाबदार आढळणे, सन २०१० मध्ये नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार संबधित अधिकाऱ्यांकडून वसूलीची कोणतीही कारवाई अद्यापही न करणे, तसेच काम न करता देयकांची पूर्ण रक्कम घेणाऱ्या कंत्राटदारविरुध्द कोणतीही कारवाई न करणे, त्यातच, प्रकल्पाच्या सिंचन क्षेत्रातील बेकायदा औद्योगिक कारखाने व दगडखाण उद्योगांमुळे हे सिंचन क्षेत्र बाधित होत असणे, या सर्वच बाबतीत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही."

(४) **डॉ. रणजित पाटील,** सर्वश्री. गोपीकिसन बाजोरिया, प्रविण पोटे पाटील **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना महत्वपूर्ण ठरलेली राष्ट्रीय सुरक्षा विमा योजना (R.S.B.Y.) अमरावती विभागातील अकोला व वाशिम या जिल्ह्यामध्ये बंद असणे, राज्यातील राजीव गांधी जीवनदायी योजना लागु होण्यास विलंब होत असणे, अशापरिस्थितीत राष्ट्रीय सुरक्षा विमा योजनेस मुदत वाढ देवून निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असणे, निधी अभावी सदर योजना बंद पडण्याच्या स्थितीत असून या योजनेस निधी उपलब्ध करुन दिल्यास रुग्णांची विशेषत: दारिद्र्य रेषेखालील रुग्णांची गैरसोय होणार नाही, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्रीमती विद्या चव्हाण वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"आरएनए विकासक यांच्याकडून सन २००५ मध्ये मुंबईतील शिवडी येथील

महानगरपालिकेच्या न्यू लेबर कॅम्प मधील जागेच्या पुनर्विकास योजनेंतर्गत तेथे १०० वर्षापासून राहणाऱ्या २५० रहिवाशांना नियम ३३(७) नुसार ४१५ स्के.फूटाचे घर देण्याचे मान्य करणे, मात्र याबाबतच्या लेखी कराराची प्रत मागणाऱ्या २४ सदस्यांना पुनर्विकसित इमारतीत राहण्यास जागा न देणे, उक्त २४ सदनिका इतर प्रकल्पग्रस्त व अनिधिकृत लोकांना देणे, यापैंकी २१ जणांना महालक्ष्मी येथे संक्रमण शिबीरात राहण्यास जागा देणे, परंतु उर्वरित ३ रहिवाशांनी या विकासकाने महानगरपालिकेच्या मराठी शाळेची २३५३.३५ चौरस मीटर जागा हडप केल्याच्या विरोधात आवाज उठविल्यामुळे अद्यापही घरे न देणे, द्वेषापोटी ८ वर्षापासून त्यांना एका संक्रमण शिबीरातून दुसऱ्या संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करीत राहणे, दिनांक २५ फेब्रुवारी, २०१३ रोजी ते राहत असलेल्या संक्रमण शिबीरातून त्यांना बेकायदेशीररित्या कोणतीही नोटीस नसतांना घराबाहेर काढणे, यातील एक वृध्द महिला कॅन्सर पिडीत असून, दुसऱ्या घरातील मुलाची १२ वीची परिक्षा चालू असणे, त्यांना पाणी, वीज घरापासून बेदखल करणे, याबाबत पालिका आयुक्ताची दिनांक १ मार्च, २०१३ रोजी या अन्यायग्रस्तांसह भेट घेऊन देखील कोणतीच कारवाई न होणे, परिणामी नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. संजय दत्त,** प्रा. सुरेश नवले, सर्वश्री. चरणसिंग सप्रा, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष चव्हाण **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रलंबित प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन प्रक्रिया पूर्ण होऊनही प्रत्यक्ष जमीन ताब्यात घेण्यासाठी सिडकोने शेतकऱ्यांशी चर्चा केली असता ३० टक्के विकसित जमीन परत देण्याची शेतकऱ्यांनी केलेली मागणी, मात्र राज्य शासनाने सिडकोच्या प्रचलित धोरणानुसार १२.५ टक्के जमीन परत देण्याची घेतलेली भूमिका शेतकऱ्यांना मान्य नसल्याने भूसंपादनाच्या कामास अडथळा निर्माण होणे, जमीन ताब्यात आल्याशिवाय प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेला परवानगी मिळणार नाही, अशी केंद्र शासनाने घेतलेली भूमिका, तीन वर्षात या प्रकल्पाची किंमत ९ वरुन १४ हजार कोटीवर गेलेली असणे, याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन सदर प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री. मोहन जोशी,** संजय दत्त **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे

**उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे शहरामध्ये बऱ्याच ठिकाणी रस्त्यावरील डी.पी. व फिडर पीलर माहे मार्च, २०१३ च्या प्रथम सप्ताहापासून उघडे दिसत असणे, वीजवाहिनी जंप तुटल्यामुळे वारंवार वीज खंडीत होणे, त्यातून अपघात होण्याची शक्यता, यामुळे महावितरणाचे मोठ्या प्रमाणात होत असलेले आर्थिक नुकसान, त्याचबरोबर उद्योग, घरगुती ग्राहकांचा वीजपुरवठा वारंवार खंडीत होत असणे, जंप तुटणे, डी.पी.जळणे हे प्रकार थांबवून यावर योग्य उपाययोजना करणे आवश्यक असणे, त्याचबरोबर मागील सहा महिन्यांमध्ये पुणे शहर व जिल्ह्यात वीज मंडळ, पुणे जिल्ह्याचा महिन्याला जवळपास ५०० कोटी रुपये महसूल असूनही वीज दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक निधी गेल्या चार महिन्यांत आलेले नसणे, यामध्ये गरीब व गरजू कंत्राटी कामगारांवर अन्याय होत असणे, परिणामी पुणे शहराच्या वीज सुरक्षितेत व मेटेनन्स यावर होत असलेला अनिष्ठ परिणाम, यामुळे जनमानसात पसरलेले तीव्र असंतोषाचे वातारण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री. गोपीकिसन बाजोरिया,** डॉ. रणजित पाटील, ॲड. अनिल परब **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"श्री संत गजानन महाराजांच्या वास्तव्याने पावन झालेल्या बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव या तिर्थक्षेत्राच्या विकास कामांसाठी राज्य शासनातर्फे ३६० कोटी रुपये मंजूर करण्यात येणे, शेगांव शहराच्या विकास कामासाठी विशेष कृती आराखडा मंजूर झाल्यानंतरही गेल्या २ वर्षापासून विकास कामे रखडली जाणे, शेगांव संस्थानाने केलेल्या कामांपेक्षा शासकीय यंत्रणेमार्फत करण्यात आलेल्या विकास कामांचा दर्जा तुलनेने निकृष्ट असणे, यामुळे भाविक व नागरीकांमध्ये निर्माण झालेली चिड, असंतोषाची भावना याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया."

(९) **सर्वश्री. भगवान साळुंखे,** रामनाथ मोते, नागो गाणार, चंद्रकांत पाटील, डॉ. रणजित पाटील **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"माहे मे, २०१० मध्ये शासनाने इंग्रजी माध्यमशाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यासाठी प्रस्ताव मागविणे. त्यानुसार हजारो प्रस्ताव दाखल होणे, माहे जून, २०१० मध्येच मान्यता देण्याची ग्वाही देणे, मान्यता मिळेल या अपेक्षेवर शेकडो संस्थाचालकांनी

शाळा सुरु करणे, संस्थाचालकांनी जागा घेऊन इमारती बांधून शिक्षकांच्या नेमणूका करुन शाळा मान्यतेची प्रतिक्षा करणे, शासनाने मात्र अद्याप मंजुरी न देणे, त्यामुळे या शाळांचे भवितव्यच अंधारमय होणे, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

(१०) **श्री. प्रविण पोटे पाटील वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"अमरावती येथील रहाटगांव परिसरात ५ कोटी रूपये खर्च करून बांधण्यात आलेल्या अनुसुचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील मुला-मुलींच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत १२ व्यवसायिक अभ्यासक्रमांना मान्यता असतांना केवळ तीनच अभ्यासक्रम सुरू केले असल्यामुळे या विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणापासून वंचित रहावे लागणे, सर्व अभ्यासक्रम सुरु करण्यास प्राचार्यांनी कोणतेच प्रयत्न केले नसल्यामुळे दरवर्षी २०० कुशल कारागीर बाहेर पडण्याऐवजी केवळ ३० ते ३५ विद्यार्थी प्रशिक्षित होवून बाहेर पडत असणे, सदर "अ" वर्ग आय.टी.आय. मध्ये ३२ पदे मंजुर असून प्रत्यक्षात १० ते १२ कर्मचारी कार्यालयात कार्यरत असल्याने मंजुर असलेली पदे भरणे व अभ्यासक्रम त्वरीत सुरू करण्याकरीता नागरीकांची सातत्याने होत असलेली मागणी, त्या अनुषंगाने शासनाने केलेली व करण्यात येत असलेली कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भुमिका."

## (सकाळी ११.३० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ)** मा.सभापतींच्या निदेशानुसार सोमवार, दिनांक २५ मार्च, २०१३ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला डॉ.रणजित पाटील, श्री.नागो गाणार, श्री.प्रविण पोटे पाटील, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३६८३९ "राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांसाठी आणलेले सोलर वॉटर हिटर विनावापर पडून असल्याबाबत"

**(ब)** तारांकित प्रश्न.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

**उप मुख्यमंत्री : (अ) :** "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** : "महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा सातवा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(क)** : "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा सातवा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ड)** : "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा सातवा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचना - (असल्यास).**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - (असल्यास).**

**पाच : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

**सहा : सन २०१३-२०१४ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा - (तिसरा व शेवटचा दिवस).**

## - मध्यंतर -

**सात : शासकीय विधेयके :-**

**विचार, खंडश: विचार व संमत करणे -**

**(अ)** सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१३.

**(ब)** सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३.

**आठ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी)**

**(१) श्री.जयवंतराव जाधव व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या व दर बारा वर्षांनी भरणाऱ्या सिंहस्थ महाकुंभमेळ्यामुळे त्र्यंबकेश्वर जि.नाशिक ह्या धार्मिक ठिकाणाचे महत्व लक्षात घेऊन येथे मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील नागरीक, भाविक व साधुसंत स्थलांतरीत होऊन नगरपालिका हद्दीबाहेर मोठमोठे आखाडे व नागरी वस्त्या तयार होत असणे, त्यामुळे येथील नगरपालिका व जिल्हा प्रशासनाने सादर केलेल्या नगरपालिकेच्या हद्दवाढी प्रस्तावास मंजूरी

देण्याची मागणी असणे, त्र्यंबकेश्वर ह्या धार्मिक व ऐतिहासिक स्थळाच्या महत्वामुळे आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभुमीवर भाविकांची वाढती संख्या व येथील वाढत्या लोकसंख्येमुळे गौतमीगंगा प्रकल्पातून वाढीव पाणीपुरवठा योजनेस मंजूरी देण्याचा प्रस्ताव प्रलंबित असणे, आगामी सिंहस्थ कुंभमेळा पूर्व तयारीच्या कामांसाठी नगरपरिषदेने तयार केलेल्या आराखड्याप्रमाणे शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.जयंत पाटील व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी त्यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, जाधववाडी औरंगाबाद येथे सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अन्नधान्याच्या पोत्यामध्ये युरीया खत भेसळयुक्त साठ्याची चौकशी करुन संबंधीतावर कारवाई करावी म्हणून दिनांक ३ सप्टेंबर, २०१२ रोजी संयुक्त समिती गठीत करण्यात येणे, सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अन्नधान्याच्या पोत्यामध्ये युरीया खत भेसळयुक्त साठ्याची चौकशी करण्याकरिता समिती अध्यक्ष व सदस्य यांनी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ जाधववाडी येथे दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ रोजी तपासणी करणे, संयुक्त समितीने महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ जाधववाडी, औरंगाबाद येथे गोदाम क्र. ५, ७ व १० मधील धान्यांची तपासणी करण्यात येणे, गोदामात आढळून आलेली ९०८८ भेसळयुक्त खतमिश्रीत धान्यांची पोती अन्न व औषधी प्रशासन महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद यांनी ९०८८ गव्हाची पोती सिल करुन या साठ्यामधील २९ गव्हाचे नमुने पुणे प्रयोगशाळा येथे तपासणीसाठी पाठविण्याबाबत व ९०८८ भेसळयुक्त खतमिश्रीत धान्यांच्या पोत्याची रक्कम रु. ७७ लाख निश्चित करुन जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद व सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१२ रोजी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना अहवाल देणे, सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत भेसळयुक्त खतमिश्रीत ९०८८ धान्यांची पोती खतमिश्रीत असल्यामुळे पुणे प्रयोगशाळा यांनी ९०८८ भेसळयुक्त खतमिश्रीत गव्हाचा धान्य साठा मानवास खाण्यास अयोग्य आहे म्हणून अन्न व औषधी प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद यांना अहवाल देण्यात येणे, त्या अनुषंगाने अन्न व औषधी प्रशासन विभाग, औरंगाबाद यांनी ९०८८ भेसळयुक्त खतमिश्रीत गहू (धान्य) असुरक्षित घोषित करण्यात येणे, यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली भिती व पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३० मार्च, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.